महाराष्ट्र शासन

**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)**,
गु.शा., मुंबई यांचे कार्यालय,
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
(नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर, डॉ. दा.नौ.
मार्ग, मुंबई - ४०० ००१.

थेट दूरध्वनी :- +९१-२२-२२६२ १२२०
ई-मेल :— cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

---

# प्रेसनोट

**कक्ष -३, गु.प्र.शा., गु.अ.वि., ना. म. जोशी मार्ग, मुंबई.** **दिनांक - २१/०७/२०२२**

## खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेबाबत.

| | |
|---|---|
| कक्ष | गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि., कक्ष -३, मुंबई. |
| पोलीस ठाणे | आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्र. व कलम | ४१०/२०२२ कलम ३०२ भादवि |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | १८/०७/२०२२ वेळ ०६.२७ वा |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | १८/०७/२०२२ वेळ ०१.३० वा. |
| फिर्यादी नाव | श्री. राहुल बबलू सौदेकर, वय २९ वर्षे, रा.ठी. रु.नं. २३, मुसा किल्लेदार इस्टेट, शनी मंदिर चौक, भायखळा (पश्चिम), मुंबई. |
| ताब्यात घेतलेल्या आरोपीची संख्या | १ पुरुष इसम, वय २३ वर्षे. |

सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. राहुल सौदेकर यांचेकडे दिनांक १८/०७/२०२२ रोजी रात्रौ ०१.३५ वाजताचे सुमारास त्यांचे वस्तीमध्ये राहणारा अनिल महेसकर हा काही लोकांना घेवुन घरी आला व त्याने किंजल टॉवरच्या समोर, पाईस स्ट्रीट, भायखळा (पश्चिम), मुंबई येथे त्यांचे भावोजी विकास महेसकर यांना काहीतरी झाले असल्याचे सांगुन गडबडीत निघुन गेला. फिर्यादीने घटनास्थळी जावुन पाहिले असता, विकास महेसकर, वय ३५ वर्षे हे रक्ताचे थारोळयात पडल्याचे दिसुन आले. त्याचे मानेवर, छातीवर व डाव्या बाजुस पोटात धारदार शस्त्राने भोसकल्याचे दिसुन आले. तसेच त्यांचे डाव्या बाजुची आतडी बाहेर आल्याचे दिसत होते. त्याचवेळी घटनास्थळी पोलीसांची गाडी आली असता, सदर गाडीतुन त्यांना नायर रुग्णालय येथे उपचाराकरीता घेवुन गेले असता, डॉक्टरांनी त्याला तपासुन दाखल करण्यापुर्वी मयत झाल्याचे घोषीत केले. सदरबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे वरीलप्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदरचा खुनाचा गंभीर गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष -३ मार्फत मा. वरिष्ठांचे आदेशाने समांतर तपास करण्यात येत होता. कक्ष -३ येथील पोलीस पथकाने अहोरात्र प्रयत्न करुन, सदर घटनास्थळाच्या ठिकाणी कोणतेही सी.सी.टि.व्ही. फुटेज नसताना आजुबाजुचे परिसरातील सी.सी.टि.व्ही. फुटची तपासणी करुन संशयीत मारेकऱ्याचा फोटो प्राप्त करुन गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील स्थानिक रहिवाशांना फोटो दाखवुन त्यांची ओळख पटविण्यात आली व सदरचा इसम हा घटनास्थळाचे बाजुचे परिसरात राहत असल्याचे आज रोजी माहिती प्राप्त झाली त्यावरुन कक्ष -३ चे पो.नि. शामराव पाटील व पोलीस पथकाने सदर संशयीत इसमाचा भरुचा कंम्पाऊंड, पाईस स्ट्रीट, किंजल टॉवर समोर, भायखळा (पश्चिम), मुंबई येथे शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास

सदर पथकाने कक्ष -३ कार्यालयात आणुन, गुन्हाचे अनुषंगाने तपास करता मयत इसम व ताब्यात घेतलेल्या इसमामध्ये पैशाचे देवाण-घेवाण वरुन वाद झाल्याने त्यावरुन सदर इसमाने धारदार चाकुने भोकासल्याचे सांगितले. सदरचा गुन्हा त्यानेच केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदरचा गुन्हा हा मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. सुहास वारके सो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. बाळसिंग राजपुत सो व मा. स.पो. आ. (मध्य) नामदेव शिंदे सो यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सोपान काकड, पोलीस निरीक्षक शामराव पाटील, स.पो.नि. प्रकाश लिंगे, स.पो.नि. समीर मुजावर, पो.उ.नि. आरिफ पटेल, पो.उ.नि. अशोक राणे, पो.उ.नि. परशुराम लोखंडे, पो.ह. विनायक जाधव, पो.ह. समीर जगताप, पो. ह. विनोद परब, पो.ह. रविंद्र देवार्डे, पो.ना. आकाश मांगले, पो.ना. राहुल अनभुले, पो.ना. वैभव गिरकर, पो.ना. सुहास कांबळे, पो.ना. प्रमोद भोजणे, पो.ना. वैभव बिडवे, पो.ना. गिरिश मोरे, पो.ना. भास्कर गायकवाड, पो.शि. मंगेश शिंदे, पो.शि. सचिन सरवदे, पो.शि. पंकज भोसले, पो.शि. राहुल पाटील, पो.शि. गोविंद पानखडे, पो.शि.चा. अनिकेत मोरे व यलप्पा तांबडे या पथकाने उघडकीस आणला आहे.

--------------